स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानविद्या शाखेअंतर्गत

लोकप्रशासन विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठी

सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधन विषय

“विकास प्रशासनात राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) भुमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”

संशोधक

विठ्ठल गणपतराव लढे

मु.मेंढला (खु) पो.कामठा ता.अर्धापुर जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ. अमोल प्रभाकर काळे

संशोधक मार्गदर्शक,
लोकप्रशासन विभाग
पीपल्स कॉलेज, नांदेड

संशोधन केंद्र
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय,नांदेड.

"विकास प्रशासनात राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) भुमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा"

1. प्रस्तावना (Inroduction) :-

लोकप्रशासन ही सामाजिक व सांघिक प्रक्रिया आहे यामध्ये समाजातील सर्व घटकांचा सहभाग महत्त्वाचा आहे, प्रशासनाला सुशासन बनवण्यासाठी समाजातील लोकांचा सहभाग अत्यावश्यक आहे, यामध्ये शासनाच्या सेवा व योजना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध माध्यमांचा अवलंब केला जातो तसेच समाजामध्ये याबद्दल जागरूकता असेल तर सेवा व योजना प्रभावीरीत्या अंमलात आणता येतील.

भारताने लोकशाही शासन व कल्याणकारी राज्याचा विचार अंगिकृत केला आहे त्यामुळे शासनाच्या कार्यामध्ये वाढ झालेली आहे,माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत विविध गरजांसाठी शासकीय सेवांची पूर्तता ही शासनाला करावी लागते. भारतातील शासन हे लोकाभिमुख असल्यामुळे यामध्ये जनतेच्या विकासाचा प्रथम विचार केला जातो.

शासनाच्या कार्यात वाढ झालेली असल्यामुळे शासनाच्या कामाचा ताणही वाढलेला आहे. लोकसंख्या वाढीचा वेग पाहता शासनामध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी पडत आहे.त्यामुळे प्रशासनाला कार्यकुशलता व गुणवत्ता टिकून ठेवणे दिवसें-दिवस अवघड होत आहे.शासनाच्या नवनवीन योजना व सेवा सामान्य लोकांसाठी आणल्या जातात परंतू

अपू-या अधिकारी/ कर्मचारी वर्गामुळे सदर योजनाची प्रत्यक्षात अंलबजाणी करणे जिकरीचे होत चालले आहे.

उपरोक्त समस्येला सामोरे जाण्यासाठीप्रशासनामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहेतसेच संगणकाचा होत असलेला विकास प्रशासनाला अंगीकृत करून प्रशासन अद्यावत ठेवणे गरजेचे आहे.

माहिती तंत्रज्ञान व संगणकाचा वापर करून प्रशासनाला आपल्या सेवा व योजना यांची पूर्तता तत्पर व कार्यकुशलपणे करणे शक्य आहे, प्रशासनाला अधिक पारदर्शक व जबाबदार बनविण्यासाठी माहिती-तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या प्रकारे होऊ शकतो. माहिती-तंत्रज्ञानाचा वापर शासनाबरोबरच शेती, शिक्षण, आरोग्य, उद्योग, सुव्यवस्था, संरक्षण अशा विविध क्षेत्रामध्ये केला जाऊ शकतो. माहिती तंत्रज्ञान व संगणकाचा वापर करून शासनाचा बराच वेळ, पैसा व श्रम खर्ची जाण्यापासूनवाचवू शकतो कारण माहिती तंत्रज्ञानामुळे प्रत्येकाच्या कामाची विभागणी व उत्तरदायित्व निश्चित केल्या जाते त्यामुळे कार्याची पुनरावृत्ती होत नाही, माहिती तंत्रज्ञानामुळे होणारा भ्रष्टाचार व पक्षपातीपणा टाळण्यास आळा बसू शकतो कारण यामध्ये कायदे व नियम यांना संलग्न राहून काम करणे अनिवार्य होते तसेच कार्यविलंब व कार्य उदासीनता याला रोखू शकते कारण यामध्ये कामाची विभागणी व उत्तरदायित्व निश्चित केल्या जाते तसेच तंत्रज्ञानामुळे समन्वय साधण्यास सोपे जाते. तंत्रज्ञानामुळे जनसंपर्कात म्हणजेच योजना, ध्येय धोरण, जनसहभाग वाढविण्यासाठी व जनतेच्या समस्या अडचणी दूर करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानचा प्रभावीपणे वापर होऊ शकतो.

राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC) :-

राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) स्थापना 1976साली डॉ.नरसिमया शेशाद्री यांच्या कल्पनेतुन झाली, तेव्हापासुन आज पर्यंत शासनाच्या ई-प्रशासनाचा आधारस्तंभ म्हणुन उदयास आले आहे. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राने (NIC) सर्व भारतभर समान नेटवर्क स्थापित केले आहे ज्याला निक नेट (NICNET)म्हणुन ओळखल्या जाते, ज्यामध्ये भारतातील सर्व सरकारी कार्यालय जोडण्याचा मानस आहे.भारतामध्ये 2000 पासून खऱ्या

अर्थाने ई- प्रशासनाला सुरुवात झाली 2001 हे वर्ष ई-प्रशासन वर्ष म्हणून साजरे केलेजाते. यामध्येच राष्ट्रीय ई-प्रशासन कार्यक्रम (NeGP-National e-Governance Plan)घोषित केला, ज्यामध्ये 2008 पर्यंत देशातील आयटी तंत्रज्ञान कशा प्रकारे वाढवता येईल याचे ध्येय ठेवले व विविध योजनांची आखणी करण्यात आली. त्यानुसार प्रत्येक विभागाची स्वतंत्रसंकेतस्थळ बनवण्याचे व त्या विभागाची माहिती संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याचे निश्चित केले.

ई-शासनामूळे जलद,अचूक व वेळेच्या बचती सहित कायद्यांची, धोरणांची व सेवांची अंमलबजावणी होते जसे की आधार कार्ड मुळे नकली लाभार्थ्यांची संख्या खुप प्रमाणत कमी झालेली आहे व तसेच पासपोर्ट व वाहन परवाना काढण्यासाठी आता कार्यालयात जाऊन रांगेत उभे राहण्याची आवश्यकता नाही त्यामध्ये तुम्ही पूर्व परवानगी घेऊन मिळालेल्या वेळेनुसार आपले कार्य पूर्ण करू शकता.

- **राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) फायदे**

1. जलद सेवा व वेळेची बचत.

2. कोणत्याही कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही, उपक्रम राबवण्यात अग्रेसर.

3. मोबाईलच्या वापरामुळे दुर्गम भागातही सहज पोहोच

4. शासनाची स्वत:ची संस्था जी माहीती तंत्रज्ञानामध्ये मदत करते.

5. शासनाच्या सर्व विभागाना तांत्रिक सहाय करणारी एकमेव संस्थ.

माहिती तंत्रज्ञानामध्ये भारतास जगाचे ज्ञान भांडार समजले जाते याचेच उदाहरण म्हणजे आपल्या देशातील माहिती तंत्रज्ञानातील अभियंत्यांना सर्व देशांमधून मागणी आहे त्यामुळे आपला देश ई-शासनाच्या बाबतीत अग्रणी देशांपैकी एक सजमला जातो, दुसरे उदाहरण म्हणजे कोरोना लसीचे व्यवस्थापन माहिती-तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केले गेले याची दखल जगभरातून घेण्यात आली ज्यामध्ये cowin.gov.in या वेबसाईट ची निर्मिती करून त्याचा वापर केला गेला व बऱ्याच देशांनी या प्रकल्पाला आत्मसात केले.

आपल्या देशातील राज्यांपैकी महाराष्ट्र हा सर्वात प्रगतशील राज्य म्हणून उदयास आलेला आहे. ज्यामध्ये जास्तीत जास्त माहिती-तंत्रज्ञानाचा वापर करून शासकीय सेवा व योजना जनतेला देण्यास सुरुवात केली गेली आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे आधारची संकल्पना अस्तित्वात आली तेव्हा देशातील प्रथम आधार कार्ड हे महाराष्ट्रात काढले गेले एवढेच नव्हे तर सध्या प्रायोगिक तत्वावर चालू असलेला IRAD (integrated road accident database)हाप्रकल्प महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम राबवण्यात येत आहे याच बरोबर महाराष्ट्रात तयार केलेले ई-कोर्ट व वाहन परवानासाठी तयार केलेले पोर्टल पूर्ण भारतभर वापरले जात आहेत.

क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या जिल्ह्यांमध्ये नांदेडची गणना होते त्यामुळे नांदेड जिल्ह्याचा राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) बाबतीत अभ्यास करणे हिताचे ठरते.

2. **<u>विषयाचे महत्व:</u>**

राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राचा (NIC) आभ्यास करण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे सध्या माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे व त्यामध्ये अत्यंत जलद गतीने प्रगती होत आहे नवनवीन तंत्रज्ञान विकसीत होत आहे त्याच प्रमाणे जनसामान्यात ही तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे कारण आज देशातील जास्तीत जास्त लोकांकडे स्मार्टफोन आहे व तो व्यवस्थितपणे हाताळताना दिसून येत आहेत, ज्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विकसित होत आहे त्याचप्रमाणे शासनाने सुद्धा माहिती-तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे, शासनाच्या प्रत्येक विभागामध्ये संगणकाचा व इंटरनेटचा वापर वाढलेला आहे व जवळपास सर्व विभागांच्या सेवा ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जात आहेत यामध्ये काही विभाग मागे आहेत कारण त्यांच्या

सेवा ऑनलाईन करत असताना येत असलेल्या तांत्रीक अडचणी दूर करण्याचा प्रयत्न त्या-त्या विभाग स्तरावर सुरू आहे.

प्रशासनातील महसूल विभागाच्या जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन दिल्या जातात त्याच प्रमाणे पोलीस प्रशासन व न्यायालयांच्या ही सेवा ऑनलाईन होताना दिसत आहेत, कोरोना सारख्या आपत्ती काळामध्ये कोर्टाच्या सुनावण्या सुद्धा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे झाल्या आहेत व त्याचा निकाल सुद्धा कोर्टाच्या वेबसाईट वर प्रदर्शित केला आहे. मागील दोन वर्षापासून सुरू असलेल्या कोरोना आपत्तीच्या काळामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर शासनामध्ये व नागरीकांमध्ये कैक पटीने वाढला आहे.माहिती तंत्राज्ञनाचा वापर प्रशासनाच्या सर्व विभागात वाढला पाहिजे पण नवीन तंत्रज्ञान वापरण्याची कर्मचाऱ्यांची उदासीनता दूर व्हावी यासाठी शासन स्तरावरून बरेच प्रयत्न पुर्वी पासुन करण्यात आले परंतू कोरोना महामारीच्या काळात सर्व वापरकर्त्यांना त्यांचे महत्वा आपसूक दिसून आले व सर्व स्तरावरून यावा वापर वाढताना दिसून येते. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्रामुळे (NIC) ई-शासनाचा वापर वाढला त्यामुळे श्रम, वेळ, पैशाची बचत होत असल्याने पुढील काळात माहिती व तंत्रज्ञाना अभावि प्रगती साधने शक्य होणार नाही त्यामुळे **“विकास प्रशासनात राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) भुमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”** या विषयाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.ई-शासनाच्या वापरामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन वेळेची बचत होते, राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्रामुळे (NIC) कर्मचाऱ्यांची कामाबद्दलची उदासीनता दूर होण्यासाठी मदत होते कारण की यामध्ये कार्य निश्चिती करणे सुलभ होते व निश्चित केलेल्या कार्यावर देखरेख ठेवणे सुद्धा सोपे होते व दैनंदिन केलेल्या कामाचा अहवाल सहज उपलब्ध होतो ज्यामध्ये विभागां-विभागा मध्ये समन्वय साधणे व कोणत्याही अधिकारी /कर्मचाऱ्यांरची जबाबदारी निश्चित करणे सुलभ होते,**“विकास प्रशासनात राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) भुमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”**या विषयावर पूर्वी अभ्यास केला गेला नाही. ई-शासनाचा वापर चांगल्या प्रकारे वाढला आहे व वेळेनुसार आता माहिती तंत्रज्ञानामध्ये पण अमुलाग्र बदल झालेला आहे, माहिती

तंत्रज्ञानामध्ये झालेल्या बदलानुसार राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राचा (NIC) चा अभ्यास करणे हिताचे ठरते.

3.समस्या सुत्रन:-

मागच्या दोन वर्षापासून चालू असलेल्या कोरोना महामारीच्या काळामध्ये प्रवास करण्यासाठी असलेला पास, कोरोनाची चाचणी, कोरोना चाचणीचा निकाल, दवाखान्यातील खाटांची संख्या, कोरोना रुग्णाला लागणाऱ्या औषधीचीउपलब्धता, कोरोना लसीसाठी नोंदणी किंवा लसीची उपलब्धता व लस घेतल्याचे प्रमाणपत्र या सर्व बाबींची उपलब्धता माहिती-तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्यवस्थापन केले.

याच बरोबर शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन वर्ग उपलब्ध होण्यासाठी झूम मिटिंग, वेबेक्स मिटिंग, मायक्रोसोफ्ट टीम असे विविध सॉफ्टवेअर वापरण्यात आले, याच सॉफ्टवेअरचा उपयोग घरी बसून कार्यालयाचे काम (Work From Home) करण्यासाठीही झाला ज्यामध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व क्लाऊड चा वापर झाला, शेतीसाठी सुद्धा पिक विमा भरणे असो किंवा बँकेतून लोन घेणे असो तसेच खत शेतापर्यंत पोहोचवणे असो यासाठीसुद्धा तंत्रज्ञानाचा वापर झाला.

कोरोना आपत्तीच्या काळात वित्तीय सेवांमध्येअमुलाग्र बदल झाला तो म्हणजे डिजिटल पेमेंट,इंटरनेट बँकिंगच्या व यूपी आय (UPI) च्या माध्यमातून अतिशय सोप्या प्रकारे पैश्यांची देवाण घेवाण होत आहेयामध्ये आणखी काही उदाहरणेही आपण लक्षात घेऊ शकतो जसे की, परिवहनाचे नियम मोडणाऱ्या नागरिकांना त्यांच्या गाडीच्या नंबर वरून नियम मोडलेल्या पुराव्यासहित लागलेला दंड एस एम एस स्वरूपामध्ये नागरिकापर्यंत पोहोचतो, बऱ्याच शहरांमध्ये व जवळपास सर्व सरकारी कार्यालयांमध्ये तसेच रस्तावर सी सी टीव्ही चा वापर वाढल्यामुळे भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई सोबतच शहरातील गुन्हेगारी वर आळा बसताना दिसत आहे,माहिति तंत्रज्ञाच्या काळामधे कार्यकुशलपणे व कोणत्याही सेवासाठी आता रोजची कामे सोडुन कार्यालयात फे-या मारण्याची आवश्यकता पडत नाही, तसेच ऑनलाईन अर्ज केल्या नंतर मुदतीत तो निकाली काढणे ही त्या विभागाची जबाबदारी बनते व अर्जाची

सद्यस्थीतीसुध्दा ऑनलाईन समजते एवढेच नव्हे तर अर्जाचा निकाल सुध्द्दा ऑनलाइन मिळतो, याच कारणामुळे**"विकास प्रशासनात राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) भुमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा"**या विषयाची निवड केली आहे, नांदेड जिल्ह्याचे भौगोलीक क्षेत्र, लोकसंख्या व तंत्राज्ञानाचा वाढता वापर पाहून राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC) आभ्यासण्यासाठी नांदेड जिल्ह्याची निवड केली आहे.

4.संशोधन पध्दती :

"विकास प्रशासनात राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) भुमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा" हे विषय शिर्षक असुन संशोधनचे स्वरुप हे वर्णनात्मक पध्दतीचे असेल यामध्ये ग्रंथालयीन, क्षेत्रीय या दोन्ही पध्दतीचा वापर केला जाईल.संशोधनात विविध प्राथमिक व दुय्यम स्त्रोतातील माहितीचा आधार घेतला जाईल. या संशोधनामध्ये माहिती गोळा करण्यासाठी लाभार्थी व जिल्हा प्रशासनातील कर्मचाऱ्यांच्या मुलाखतीद्वारे माहिती संकलित केली जाईल.

5.तथ्य संकलन :

माहिती संकलनासाठी खालील स्त्रोताचा वापर करण्यात येइल.

प्राथमिक तथ्य संकलन :

या संशोधन कार्यासाठी नांदेड जिल्ह्यातील लाभार्थी आणि जिल्हा प्रशासनातील कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष भेटी घेवून प्राथमिक माहिती गोळा केली जाईल. संशोधन कार्यासाठी संबंधित चौकशी व आवश्यक माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली तयार केली जाईल व वेळापत्रक पद्धतीनुसार मुलाखतीद्वारे माहिती संकलित केली जाईल.

दुय्यम तथ्य संकलन:

अभ्यासासाठी आवश्यक असलेली माहिती संकलित करण्यासाठी जिल्हा कार्यालये, ई-शासनबद्दलची पुस्तके आणि जर्नल्स, शोधनिबंध, शासन अहवाल आणि राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) संबंधित वेबसाइट्स वापरून माहिती गोळा केली जाईल.

नमुना निवड:

राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्रातील (NIC) व विकास विभागात कार्य करणा-या 50 लोकांची निवड करुन मुलाखती व प्रश्नावली द्वारे माहिती संकलीत केली जाईल,संशोधनासाठी माहिती संकलित करताना यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर यामध्ये करण्यात येत आहे.

<u>६.संशोधनाची उद्दिष्टे :</u>

राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्रामुळे (NIC) ई-शासन आता चंगली प्रगती करताना दिसत आहे ज्यामध्ये सामान्य लोकांना सुद्धा ऑनलाईन सुविधांचे महत्व कळलेले आहे, कारण त्यांना आपलेदैनंदिन काम सोडून कार्यालयात ये-जा करण्याची आवश्यकता भासणार नाही तसेच ऑनलाईन सुविधेव्दारे अर्ज केल्यानंतर त्याचा वेळेत निपटारा करण्याची हमी देणारा “सेवा हमी कायदा 2015” पारित झालेला आहे. तसेच पूर्वी या तंत्रज्ञानाचा लोकांना अडसर वाटत असे, तोआता दूर होताना दिसत आहे. कारण पूर्वी ज्या सेवा मिळवण्यासाठी महागडे संगणक व इतर साहित्य लागत असे, तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत असे पण आता त्याच सेवा मोबाईलव्दारे माफकदरात उपलब्ध होत आहेत.

1. जिल्हा प्रशासन गतीमान करण्यासाठी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्रच्या (NIC) योगदानाचा अभ्यास करणे.
2. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC) शासनाच्या प्रत्येक विभागापर्यंत पोहचले आहे कि नाही हे तपासणे.
3. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) संरचना तपासणे.
4. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्रासमोरील (NIC) आव्हानाचा अभ्यास करणे.
5. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राच्या (NIC) मार्गदर्शनानंतर व तांत्रिक सहाय्यानंतर विकास प्रशासनात झालेला बदल जाणुन घेणे.

<u>७.संशोधन अभ्यासाची गृहितके :</u>

1) राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC) विकास प्रशासनाला लागणा-या तांत्रिक सहाय्याचे वितरण व व्यवस्थापन उत्कृष्टरीत्या करते.

2) अधुनिक काळात जिल्हा प्रशासनाला राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) अत्यंत आवश्यकता आहे.
3) शासकीय अधिकारी/ कर्मचारी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC) या विभागाबदल समाधानी आहेत.
4) राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राची (NIC) इतर विभागांतील भुमिका दिवसेंदिवस वाढत आहे.
5) राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्रामुळे (NIC) खाजगी कंपन्याची विकास प्रशासनातील मक्तेदारी कमी झाली आहे.
6) राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्रातील (NIC) अधिकारी /कर्मचारी यांना दैनदिन प्रशासनात वेगवेगळ्या भुमिका बजावाव्या लागतात.

9.साहित्याचा आढावा :

1)एन इ जी पी वेबसाईट (https://www.meity.gov.in) भारतातील ई-शासन संगणकीकरणापासून ते नागरिककेंद्रितता, सेवा अभिमुखता आणि पारदर्शकता यासारख्या राज्यकारभाराचे बारीकसारीक मुद्दे अंतर्भूत करणाऱ्या उपक्रमांचा सातत्याने विकास झालेला आहे. देशाच्या प्रगतीशील ई-शासन धोरणाला आकार देण्यासाठी पूर्वीच्या ई-शासन उपक्रमांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक स्तरावर सरकारच्या विविध शाखांमध्ये ई-शासनच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी, समान दृष्टीकोन आणि धोरणाद्वारे मार्गदर्शित, एक कार्यक्रम स्वीकारणे आवश्यक होते . या दृष्टिकोनामध्ये मूळ आणि पायाभूत सुविधांची देवाणघेवाण, आंतरकार्यक्षमता सक्षम करणे आणि नागरिकांसमोर सरकारचा दृष्टिकोन मांडून खर्चात मोठी बचत करण्याची क्षमता आहे.

2) आरटीएस 2005 वेबसाईट (https://aaplesarkar.mahaonline.gov.in/)

महाराष्ट्र राज्यामध्ये नागरिकांना सेवेचा हक्क देणारा क्रांतीकारी कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५. या कायदयान्वये राज्याच्या नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबद्ध सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्यांतर्गत कोणत्या

सेवा नागरिकांना प्राप्त करून घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे, ही माहिती आपण आर.टी.एस. महाराष्ट्र या मोबाईल ॲप वर किंवा आपले सरकार वेब पोर्टल वर पाहू शकता व सेवा प्राप्त करण्याकरिता ऑनलाईन अर्ज सुद्धा करू शकता. सेवा प्रदान करताना विलंब झाल्यास किंवा संयुक्तिक कारण नसताना सेवा नामंजूर करण्यात आली तर नागरिक प्रथम अपील, द्वितीय अपील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व तिसरे आणि शेवटचे अपील आयोगाकडे दाखल करू शकतात.

3) एन आय सी वेबसाईट: (www.nic.in/)

1976 मध्ये केंद्र आणि राज्य सरकारांना विकासाच्या विविध पैलूंमध्ये तंत्रज्ञान-आधारित उपाय व मदत प्रदान करण्याच्या उद्देशाने याची स्थापना करण्यात आली. केंद्र सरकारला माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) आणि ई-गव्हर्नन्स सहाय्य स्वीकारण्यात आणि प्रदान करण्यात NIC महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

त्याच्या अत्याधुनिक पुर्ण भारतभर पसरलेल नेटवर्क (NICNET), नॅशनल नॉलेज नेटवर्क(NKN), नॅशनल डेटा सेंटर्स, नॅशनल क्लाउड, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, ईमेल आणि मेसेजिंग सर्व्हिसेस, डोमेन नोंदणी आणि वेबकास्ट यांचा समावेश आहे.

NIC ने नागरिकांना डिजिटल पद्धतीने सक्षम करण्यासाठी 'वन-नेशन वन-प्लॅटफॉर्म उपक्रमासह देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी अनेक डिजिटल माध्यम विकसित केले आहेत. त्याच्या सेवांनी नागरिक, सरकारी कर्मचारी आणि व्यवसाय यांच्याशी सरकारचा परिपूर्ण संवाद निर्माण केला आहे.

प्रगत आणि मजबूत पायाभूत सुविधा, डिजिटल प्लॅटफॉर्म तसेच ऑन-ग्राउंड सेवांसह, NIC सर्वांगीण डिजिटल माध्यमाद्वारे नागरिकांना सरकारशी जोडत आहे आणि ते तंत्रज्ञान-सक्षम सेवा सुनिश्चित करते जे पोहोचत नसलेल्या लोकांपर्यंत पोहोचते.

१०.संशोधन आराखडा:

संशोधनाचा अंतिम अहवाल लेखन शास्त्रीय पध्दतीने खालील प्रकरणाच्या माध्यमातुन केले जाईल.

प्रकरण 1: प्रस्तावना व संशोधन पध्दती.

प्रकरण २: विकास प्रशासनावर एक दृष्टीक्षेप.

प्रकरण ३: राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC) संरचना आणि भुमिका.

प्रकरण ४: विकास विषयक योजना आणि राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्रातील सहसंबध.

प्रकरण ५: राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC) आणि अंतरविभागीय संबध.

प्रकरण ६: निष्कर्ष आणि सिफारसी.

११.संदर्भ सुची:

१. Chandrakantrao, WadwaleBajirao (2011)."The e Administration in District administration problems and solutions with special reference to Nanded District"

२. Sunil Godse (2008)." E government Adaptation and diffusion-Lesson From Outsourcing Industry"

३. M P Gupta,Jaijit B And Ahok Agarwal. "Evaluating E-Government"

४. https://aaplesarkar.mahaonline.gov.in/

५. https://negd.gov.in/

६. M Ali Hussain. "Good Governance through E Governance"

७. सुनिल पोटेकर. "महा ई गवर्नन्स "

८. प्रा. के.आर.बंग, "जिल्हा प्रशासन"

९. www.nic.in/

मार्गदर्शक

प्रा.डॉ. अमोल प्रभाकर काळे

संशोधक मार्गदर्शक,

लोकप्रशासन विभाग

पीपल्स कॉलेज, नांदेड

संशोधक

विठ्ठल गणपतराव लढे